प्रेसनोट दिनांक – ०३/०१/२०२५

**ठाणे – १) लोकसेवक चेतन आत्माराम चौधरी, पद –सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अंबरनाथ, वर्ग–२ २) विजयसिंग अजबसिंग पाटील, पद– कनिष्ठ लिपीक, अति. कार्यभार सहाय्यक सरकारी अधिकारी, (प्रभारी), सहा. निबंधक सहकारी संस्था, अंबरनाथ,वर्ग– ३ यांचेविरूध्द लाचलुचपत प्रतिबंध विभागाकडून सापळा कारवाई झालेबाबत.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | **ठाणे** |
| गुन्हा नोंद कमांक | दि. ०४/०१/२०२५ रोजी बदलापूर पूर्व पोलीस स्टेशन, ठाणे शहर दै.क्र. ००३/२०२४, ००.५५ वा. |
| लेकसेवकाचे नाव व कार्यालय | १) लोकसेवक चेतन आत्माराम चौधरी, पद –सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अंबरनाथ. वर्ग–२<br>२) लोकसेवक विजयसिंग अजबसिंग पाटील, वय – ४४, धंदा – नोकरी, कनिष्ठ लिपीक, अति. कार्यभार सहाय्यक सरकारी अधिकारी, ( प्रभारी ), सहा. निबंधक सहकारी संस्था, अंबरनाथ. वर्ग– ३ |
| मागितलेली लाचेची रक्कम | ७०,०००/– रूपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ६०,०००/– रूपये |
| थोडक्यात हकिकत | यातील तक्रारदार यांनी दि. ०३/०१/२०२५ रोजी दिलेल्या तक्रारीत तक्रारदार यांचेकडे लोकसेवक पाटील यांनी स्वत:साठी व वरिष्ठांसाठी इमारतीची गृहनिर्माण संस्था स्थापन करणेसाठी ७०,०००/– रु. लाचेच्या रकमेची मागणी केल्याची तक्रार प्राप्त झाली होती.<br>सदर तक्रारीच्या अनुषंगाने दि. ०३/०१/२५ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान लोकसेवक विजयसिंग अजबसिंग पाटील यांनी तक्रारदार यांचेकडे इमारतीची गृहनिर्माण संस्था स्थापन करणेसाठी तडजोडीअंती ६०,०००/– रु. लाचेच्या रकमेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार दि. ०३/०१/२०२५ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक श्री पाटील यांनी तक्रारदार यांचेकडुन मागणी केलेली लाचेची रक्कम पंच साक्षीदार यांचे समक्ष ६०,०००/– रु. तक्रारदार यांचेकडुन स्विकारली. तसेच सदर रक्कम स्विकारण्याकरीता लोकसेवक चेतन पाटील, सहायक निबंधक यांनी प्रोत्साहन दिले आहे. सदर वेळी लोकसेवक श्री. पाटील यांनी लाचेची रक्कम स्विकारल्याने सापळा पथकाने लोकसेवक विजयसिंह पाटील यांना रंगेहाथ पकडून ताब्यात घेण्यात आले असून लाचेची रक्कम लोकसेवक यांचेकडून हस्तगत करण्यात आली आहे. |

मार्गदर्शक अधिकारी:– मा. श्री. शिवराज पाटील, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.
मा. श्री. सुहास शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो,ठाणे परिक्षेत्र, ठाणे.
मा. श्री. संजय गोविलकर, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र,ठाणे.

---

लाचलुचपत प्रतिबंधक विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवका बद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा

संपर्क पत्ता :– ला.प्र.वि.ठाणे मध्यवर्ती कारागृहा समोर, ठाणे पश्चिम ४००६०१
संकेतस्थळ :– acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई–मेल :– spacbthane@mahapolice.gov.in
ऑनलाईनतक्रार अॅप्लीकेशन :– acbmaharashtra.net
टोलफ्रीनं :– १०६४
दुरध्वनीक्र. :– ०२२–२०८१३५९८/२०८१३५९९

(माधवी राजेकुमार)
पोलीस उप अधीक्षक
ला.प्र.वि., ठाणे.

पोलीस उप अधीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे